नियमित फौजदारी खटला नं. १५११/२०२५

निशाणी– १६

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः– जगन्नाथ गोविंदराव देशमुख

वयः– ६१ वर्षे, धंदाः– सेवानिवृत्त

राहणार– कोहिनुर मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, सावेडी, अहमदनगर

## सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः–

१. दि. ३०/०७/२०२४ रोजी रात्री १०.४५ वा. माझी पत्नी अहिल्या हिने मला सांगितले की, नेहमीप्रमाणे कोहिनुर मंगल कार्यालयाच्या मागे ती १०.१५ वा. शतपावली करत असताना पाठीमागुन कोणीतरी मोटार सायकलवरुन येऊन तिच्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ओढुन घेऊन गेला. त्याने हेल्मेट घातलेले असल्यामुळे तिने ओळखले नाही. पत्नीने मला फोनवरुन सदर घटना सांगितली त्यामुळे मी तेथे आलो व पोलिसांना फोन केला त्यानंतर आरोपी विरुध्द मी फिर्याद नोंदविली. मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. १७** देण्यात येत आहे.

२. दि. २४/०१/२०२५ रोजी पोलिसांनी मला तपास सुरु असल्याचे सांगितले. पोलिसांनी मला गुन्हयातील दोन्ही आरोपींनी पत्नीचे गळयातील मंगळसुत्र ओढुन नेल्याचे सांगितले. त्याप्रमाणे माझा पुरवणी जबाब नोंदविण्यात आला.

सरतपास पूर्ण.

## उलट तपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. शेख यांचे मार्फतः–

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ व माझे घर जवळ जवळ आहे. माझ्या

घरापासुन तोफखाना पोलीस स्टेशन पाऊण कि. मी अंतरावर आहे. तेथे जायला पाच मिनीटाचा वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या एक दिवसानंतर मी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्याद देण्यासाठी झालेल्या उशिराचे कारण पोलिसांना सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पत्नीने दिलेल्या माहितीवरुन फिर्याद दिली आहे. मी स्वतः घटना बघितली नाही.

उलटतपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.08 15:22:29 +0530

दि. ०८/०४/२०२६.

( एल. एस. पाढेण )

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.

नियमित फौजदारी खटला नं. १५११/२०२५
निशाणी– १८

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः– अहिल्या जगन्नाथ देशमुख

वयः– ५३ वर्षे, धंदाः–गृहिणी

राहणार– कोहिनुर मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, सावेडी, अहमदनगर

## सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः–

१. दि. ३०/०७/२०२४ रोजी रात्री १०.३० वा. दरम्यान मी गणेश लॉड्रीसमोर शतपावली करत असताना पाठीमागुन कोणीतरी मोटार सायकलवरुन येऊन माझ्या गळयातील ०७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र ओढुन घेऊन गेला. त्याने हेल्मेट घातलेले असल्यामुळे मी बघितले नाही. परंतु त्याचे अंगात पांढ–या रंगाचा शर्ट व काळी पॅन्ट होती. त्यामुळे माझ्या पतीला फोन करुन बोलावुन त्यांना सदर घटना सांगितली. त्यांनी पोलिसांना फोन केला त्यानंतर आरोपीं विरुध्द फिर्याद नोंदविली. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

२. दि. २२/०१/२०२५ रोजी पोलिसांनी मला पुन्हा बोलाविले होते. पोलिसांनी मला गुन्हयातील दोन्ही आरोपींनी माझ्या गळयातील मंगळसुत्र ओढुन नेल्याचे सांगितले व माझा पुरवणी जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

## उलट तपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. शेख यांचे मार्फतः–

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ व माझे घर जवळ जवळ आहे. माझ्या घरापासुन तोफखाना पोलीस स्टेशन पाऊण कि. मी अंतरावर आहे. तेथे जायला पाच

मिनीटाचा वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या एक दिवसानंतर फिर्याद दिली. मी पोलिसांना चोरी गेलेल्या मंगळसुत्राचे बिल दिले नाही. मी पोलिसांना आरोपींनी हेल्मेट घातल्याचे सांगितले होते सदर बाब माझ्या जबाबामध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर कथन केल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.08 15:22:37 +0530

दि. ०८/०४/२०२६. ( एल. एस. पाढेण )

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.

नियमित फौजदारी खटला नं. १५११/२०२५

निशाणी– १९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा जबाब.**

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः– सौरभ जगन्नाथ देशमुख

वयः– ३० वर्षे, धंदाः–खाजगी नोकरी

राहणार– कोहिनुर मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, सावेडी, अहमदनगर

**सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः–**

१. फिर्यादी माझे वडिल आहेत. माझ्या आईचे नाव अहिल्या देशमुख आहे. दि. ३०/०७/२०२४ रोजी मी घरीच होतो. रात्री १०.३०वा. दरम्यान मी घरात वरच्या माळयावर होतो. त्यावेळेस माझी आई गणेश लॉड्रीसमोर शतपावली करत होती. तिने मला फोन करुन खाली बोलाविले व सांगितले की, शतपावली करत असताना पाठीमागुन कोणीतरी मोटार सायकलवरुन येऊन तिचे गळयातील ०७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र ओढुन घेऊन गेला. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता.

२. दि. २४/०१/२०२५ रोजी पोलिसांनी मला पुन्हा बोलाविले होते. पोलिसांनी मला गुन्हयातील दोन्ही आरोपींनी माझ्या आईच्या गळयातील मंगळसुत्र ओढुन नेल्याचे सांगितले व माझा पुरवणी जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

**उलट तपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. शेख यांचे मार्फतः–**

३. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ व माझे घर जवळ जवळ आहे. माझ्या घरापासुन तोफखाना पोलीस स्टेशन पाऊण कि. मी अंतरावर आहे. तेथे जायला पाच मिनीटाचा वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की, जबाबामध्ये मी पोलिसांना घटनेच्या वेळी मी व वडिल टी. व्ही. पाहत होतो असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, वर

कथन केल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.08 15:22:45 +0530

दि. ०८/०४/२०२६.

( एल. एस. पाढेण )

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.

नियमित फौजदारी खटला नं. १५११/२०२५
निशाणी– २०

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ चा जबाब.</u>

मी शपथेवर कथन करतो की,

माझे नांवः– मनोहर मुकूंद रानडे

वयः– ६५ वर्षे, धंदाः–सेवानिवृत्त

राहणार– कोहिनुर मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, सावेडी, अहमदनगर

## <u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः–</u>

१. दि. ०१/०८/२०२४ रोजी पोलिसांनी मला चोरी संदर्भात पंचनामा करण्याकरिता फिर्यादीचे घरासमोर समर्थ कॉलनी, गणेश लॉड्रीसमोर, कोहिनुर मंगल कार्यालयाच्या पाठीमागे, सावेडी, अहमदनगर येथे बोलाविले होते. पोलिसांनी तेथे माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. पोलिसांनी संपूर्ण पंचनामा माझ्या समक्ष केला व त्यावर मी वाचुन सही केली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. २१</u>** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

## <u>उलट तपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. शेख यांचे मार्फतः–</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी व त्यांचे पत्नीला सात ते आठ वर्षापासुन ओळखतो. पोलिसांनी मला पंच म्हणुन हजर राहण्याकरिता पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर पंचनामा माझ्या समक्ष झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला बोलाविले व सही करायला सांगितले व मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी खोटा पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.08 15:22:52 +0530

दि. ०८/०४/२०२६. ( एल. एस. पाढेण )

मुख्य न्यायदंडाधिकारी

अहमदनगर.